# प्रकरण तीन

## एकात्मिक बालविकास विभाग

**3.906 13 वा वित्त आयोग मानव विकास नाबार्ड अंगणवाडी इमारत बांधकामासाठी दिलेले निधी ग्रामपंचायतीने अंगणवाडी बांधकामासाठी न वापरता पडून राहिलेला आहे.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत एकात्मिक बाल विकास विभागाने 13वा वित्त आयोगाकडून सन 2010-11 पासून नाबार्डने अंगणवाडी बांधकामासाठी ग्रामपंचायतीला निधी वितरीत केला असून बांधकाम होणे बाकी असल्याचे दिसून येते. सदरच्या योजनेतून विभागाने रक्कम रुपये 367.20 लक्ष खर्च नमूद केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बाल विकास विभागाने संचिका टिपणी क्र.एन-3,दिनांक 10/11/2014 नुसार सन 2010-11 व 2011-12 मध्ये DPDC व 13 वा वित्त आयोगाकडून अंगणवाडी बांधकामाकरिता पंचायत समिती स्तरावरून निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. जागेच्या वादामुळे व चार व साडेचार लाखामध्ये काम पूर्ण होत नसल्यामुळे ग्रामपंचायतीकडे निधी पडून होता.

2) DPDC 4.00 लक्ष, 13वा वित्त आयोग 13.50 लक्ष, आदिवासी उपयोजना 4.00 लक्ष, मानव विकास कार्यक्रम 49.50 लक्ष असे एकूण 67.00 लक्ष शासन खाती भरणा करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या टिप्पणी संचिकेत दिसून येते. शासन खाती भरल्याबाबत चलन संचिकेत नाही.

**3.907 अंगणवाडी बांधकामाच्या स्थितीबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2014-15 या वर्षात अंगणवाडी बांधकामासाठी प्राप्त अनुदान रुपये 7,75,50,000/- व खर्च रुपये 6,09,94,136/- झालेला असुन रुपये 1,65,55,864/- अनुदान शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मीक बाल विकास प्रकल्पास सन 2014-15 अखेर अंगणवाडी बांधकामासाठी रुपये 40,01,01,000/- इतका निधी असून सन 2014-15 अखेर रुपये 17,50,34,278/- इतका खर्च झालेला आहे. सन 2013-14 मध्ये बीगर आदिवासी योजनेतून रक्कम रुपये 6,14,96,779/- व आदिवासी उपयोजनेतून रुपये 1,00,00,000/- एकुण रक्कम रुपये 7,14,96,779/- एवढा निधी शासनास परत करण्यात आलेला आहे. दिनांक 31/03/2015 अखेर रुपये 15,35,69,943/- एवढया मोठया प्रमाणात निधी शिल्लक आहे. सन 2014-15 मध्ये किती कामे पूर्ण / अपुर्ण कामाची माहिती विभागात ठेवण्यात आलेली नाही. बांधकामाची मुदत 1 वर्ष असतांना सन 2010-11, 2011-12 व 2012-13 या वर्षाची कामे देखिल अदयाप पूर्ण झालेली नाही.

2) 2236 या लेखाशिर्षा खाली रुपये 8,45,95,314/- इतका निधी शिल्लक आहे, 13 व्या वित्त आयोगाअंतर्गत 2012-13 चा निधी कामे मंजूर असतांना खर्च केलेला नाही. सन 2014-15 या वर्षात रुपये 3,18,994/- इतका खर्च नोंदविलेला आहे व रुपये 1,43,80,940/- इतका निधी शिल्लक आहे, मानव विकास मिशन अंतर्गत सन 2011-12 मध्ये रुपये 34,42,50,000/- इतके अनुदान प्राप्त झालेले आहे व यापैकी सन 2014-15 पर्यत रुपये 90,78,404/- इतका निधी खर्च झालेला आहे व रुपये 2,53,46,596/- इतका निधी शिल्लक आहे.

3) अखर्चित निधी करंट खाती असल्यामुळे या खात्यावर व्याज प्राप्त झालेले नाही, व जिल्हा परिषदेच्या रकमा अल्प मुदतीसाठी फिक्स डिपॉजीट मध्ये रक्कम ठेवली असती तर रुपये 1,20,00,000/- इतक्या रकमेपर्यत व्याज प्राप्त होणे अपेक्षीत असतांना शिल्लक रकमेचे योग्य वेळी गुंतवणक करणे बाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा केलेला नाही.

4) एकुण 849 कामापैकी 203 कामे रद्द करण्यात आल्यामुळे रुपये 8,88,75,000/- इतका निधी खर्च होणार नाही. 23 टक्के कामे रद्द करण्यात आलेली आहेत व 44 टक्के कामे अपूर्ण स्थितीत आहेत. सदर कामे 6

महिन्यात पूर्ण होणे आवश्यक असतांना ती पुर्ण झालेली नाहीत. अपूर्ण कामाची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

महिला व बालविकास विभागास अंगणवाडी बांधकाम योजना प्रभावीपणे राबविणेसाठी आवश्यक उपाय योजना करणे आवश्यक असतांना बांधकाम विभाग, ग्राम पंचायती यांचेकडील समन्वय नसल्याने निधी उपलब्ध असून देखिल या योजनेचा पूर्ण लाभ लाभार्थ्यांना झालेला नाही.

**3.908 दुबार प्रदान केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** झेरॉक्स् बिलाचे प्रदानावर एकूण रुपये 19,400/- खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 20/12/2014 ते 23/03/2015 चे झेरॉक्स बिल प्रमांणक क्रमांक 59 व 116 अनुक्रमे दिनांक 31/03/2015 ने दुबार प्रदान झालेले आहे.

2) प्रमांणक क्रमांक 59 चे झेरॉक्स बिलाची नोंद साठा नोंदवहीत पान क्रमांक 181 वर घेण्यात आलेली आहे. परंतु प्रमांणक क्रमांक 116 ची नोंद साठा नोंदवहीत घेण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार प्रदानाची रक्कम रुपये 9,500/- वसूल करुन शासन सदरी भरणा करण्यात यावी.

**3.909 अंगणवाडी इमारत बांधकाम अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** एकात्मिक बाल विकास सेवा योजना जिल्हा परिषद पुणे कडील अंगणवाडी इमारत बांधकामासाठी शासन निधीमधून सन 2012-13 मधील 150 सन 2013-14 मधील 200 अंगणवाड्या व सन 2014-15 मधील 225 अंगणवाडी इमारत बांधकामासाठी अनुदान प्राप्त झाले होते. यातील अनुदान वाटप रक्कम रुपये 14,46,51,976/- खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2012-13 मधील अखर्चित रक्कम रुपये 4,17,14,716/- यातून 150 अंगणवाडी बांधकामांना मंजुरी दिलेली आहे. सन 2013-14 मधील प्राप्त अनुदान रूपये 6,00,00,000/- असे एकूण रक्कम रूपये 10,17,14,716/- या प्राप्त मधून सन 2013-14 मध्ये रूपये 8,38,65,283/- खर्च दर्शवून सन 2014-15 मध्ये शिल्लक रक्कम रूपये 1,78,49,433/- दर्शविली आहे. सन 2012-13 मधील मंजुर झालेल्या 150 अंगणवाड्यांचे बांधकाम पूर्ण झाले बाबत कोणतेही कागदपत्र नस्ती सोबत उपलब्ध झालेले नाही. ज्या बाबीकरीता अनुदान प्राप्त झालेले आहे त्याच बाबीवर खर्च झाले बाबतचे प्रमाणपत्र, विनियोग दाखले उपलब्ध झाले नाही.

2) सन 2012-13 मधील 150 अंगणवाडीचे मंजुरी आदेश व प्रत्येक वर्षात प्राप्त झालेली खर्च रक्कम, अखर्चित रक्कम, व पुन्हा पुढील वर्षी घेतलेली मंजुरी त्याचे आदेश इत्यादि कागदपत्रे उपलब्ध झालेले नाही. मंजूर आदेशाप्रमाणे किती अंगणवाड्यांचे बांधकाम पूर्ण झाले किती अपूर्ण आहेत, पूर्ण झालेल्या बांधकामा बाबत पूर्णत्वाचे दाखले, विनियोग दाखले, याची माहिती उपलब्ध झालेली नाही. पूर्ण झालेल्या अंगणवाडीची नोंद, मालमत्ता नोंदवही मध्ये घेतलेली नाही.

3) सन 2013-14 च्या अखेर विवरणपत्रामध्ये सन 2012-13 मधील मंजुर 150 अंगणवाड्यांची शिल्लक दर्शविलेली रक्कम रूपये 1,78,49,433/- मधील किती रक्कम सन 2014-15 अखेर खर्च झाली त्यास घेतलेली मान्यता त्यातील शिल्लक रक्कम याचा तपशील व अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत. सन 2013-14 साठी जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी पुणे यांचे दिनांक 30/11/2013 अन्वये 200 नवीन अंगणवाडी बांधकामासाठी रक्कम रूपये 6,00,00,000/- अनुदान प्राप्त झाले. जिल्हा परिषद,पुणे वित्त विभाग आदेश क्रमांक जिप वित्त/अंदाज-3/116/2014,दिनांक 10/03/2014 अन्वये सदर रक्कम वितरीत केली या आदेशांमधील अट व शर्त अ.क्र 1 ते 14 प्रमाणे बांधकाम अनुषंगिक कागदपत्रे व प्रमाणपत्रे नस्तीसोबत उपलब्ध नाहीत. सन 2013-14 मधील मंजुर 200 पैकी सन 2014-15 अखेर पूर्ण-अपूर्ण व सुरू अंगणवाडी बांधकामे, पूर्ण इमारतीच्या मालमत्ता नोंदवहीमधील नोंदी, विनियोग दाखले, तसेच बांधकामासाठी स्वतःची जागा व जागा उपलब्ध नसलेस पर्यायी/दुबार मंजुरी आदेश, अखर्चित रकमांबाबतची कार्यवाही याचा तपशील उपलब्ध झाला नाही. सन 2014-15 साठी 225

अंगणवाडी इमारत बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती यांचे दिनांक 10/02/2015 च्या आदेशान्वये रक्कम रूपये 42 लक्ष उपलब्ध निधी जिल्हा परिषदेने दिनांक 24/03/2015 रोजी विलंबाने वितरीत केला आहे. या आदेशामधील इमारत बांधकाम बाबत कार्यकारी अभियंता यांचेकडील प्रमाणपत्रे, विनियोग दाखले इत्यादी तपशील उपलब्ध झाला नाही.

4) टिपणी दिनांक 24/03/2015 रक्कम रूपये 15,38,06,595/- एवढे अनुदान उपलब्ध असताना 100 टक्के अनुदान वाट्प न करता रक्कम रूपये 1,75,20,465/- या रकमेपेकी रक्कम रूपये 91,54,619/- ही रक्कम मार्च 13 व मार्च 14 अखेर मंजुरी नसताना खर्च केली आहे. दिनांक 14 जानेवारी 2015 अन्वये कार्योत्तर मंजुरी घेतलेली आहे.

5) सन 2012-13, 2013-14 व 2014-15 या तीन वर्षातील अनुक्रमे 150, 200, 225 अशी एकूण 575 व सन 2010-11 मधील 66 अशा एकूण 641 अंगणवाडी इमारत बांधकामाचे सन 2014-15 अखेर एकूण प्राप्त अनुदान, झालेला खर्च, शिल्लक अखर्चित रक्कम या बाबतची माहिती उपलब्ध न झालेने ताळमेळ घेता आला नाही.

6) महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि/2014/प्र.क्रं.387 /का-6, दिनांक 14/01/2015 अन्वये सन 2010-11 मधील अखर्चित निधीस रुपये 1,75,20,465/- ना सन 2014-15 मध्ये खर्च करणेस मंजूरी दिलेली आहें. तथापी सन 2010-11 ची अखर्चित निधी सन 2012-13 व सन 2013-14 अखेर रक्कम रुपये 91,54,619/- प्रत्यक्ष खर्च केलेला दिसून येते.

7) सन 2012-13 व 2013-14 मध्ये सन 2010-11 ची अखर्चित रक्कम रुपये 91,54,619/- खर्च केलेली आहे व त्यास कार्योत्तर मंजूरी घेतलेली आहे अस नमूद आहे परंतु सदरची रक्कम रुपये 91,54,619/- असंवितरीत मध्ये तफावत दिसून येते.

8) सन 2014-15 तील एकूण वितरीत अनुदान रक्कम रुपये 14,46,976/- चे विनियोग दाखले लेखा परीक्षणास उपलब्ध करुन देणेत आलेले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 च्या नियम 197 मध्ये नमूद केले प्रमाणे अंगणवाडी इमारत बांधकामाच्या नोंदी मालमत्ता विहीत नमुना नंबर 69 मध्ये घेतलेचे उपलब्ध करुन दिलेले नाही.

**3.910 अंगणवाडी बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** एकात्मिक बाल विकास सेवा योजना, जिल्हा परिषद, साताराने अंगणवाडी बांधकामासाठी रक्कम रुपये 9,07,71,526/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंगणवाडी बांधकामासाठी प्राप्त अनुदानाची रक्कम वित्तप्रेषणाने बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आली असून रक्कम रुपये 9,07,71,526/- खर्च केला असून रक्कम रुपये 8,70,28,474/- अखर्चित आहे. तसेच एकूण 295 अंगणवाडयांची कामे अपुर्ण आहेत. दोन्ही विभागांनी एकत्रित नियोजन न केल्याने बांधकामे अपुर्ण असल्याचे दिसून येते.

2) सन 2013-14 मधील 63 अपुर्ण अंगणवाडयांबाबत स्वत:ची जागा असल्याबाबत व बांधकाम सुरु केलेबाबत कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

3) इमारत पुर्ण झाल्याच्या नोंदी मालमत्ता नोंदवहीत घेतलेबाबत विनीयोग दाखले उपलब्ध नाहीत. मंजूर रकमेपेक्षा कमी खर्च झाल्याने अखर्चित रकमा शासनाकडे भरणा करणे आवश्यक असून तसे केल्याचे आढळून आले नाही.

4) सन 2011-12 मध्ये दत्तनगर कोडोली या मंजूर अंगणवाडी ऐवजी भाटमवाडी अंगणवाडीस मंजूरी घेतली आहे. उशीरा मंजूरीमुळे शासनाचा 4.5 लक्ष निधी गुंतून राहिल्याचे दिसून येते.

5) सन 2014-15 मधील मंजूर 271 पैकी 39 अंगणवाडया पुर्ण आहेत. मंजूरीच्या 14 टक्के अंगणवाडया पुर्ण आहेत. त्या पुर्ण झाल्याची खात्री करणे तसेच ग्रामपंचायतींकडे वर्ग करणे व वापरणे आवश्यक आहे.

6) शासनाकडून प्राप्त निधी व मार्गदर्शक तत्वांचे कटाक्षाने पालन करुन नियोजन व प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही. त्यामुळे इमारती अभावी भाडयापोटी झालेला खर्च रुपये 20,00,000/- चे नुकसान झाले आहे. योग्य नियोजन व अंमलबजावणी आवश्यक आहे.

**3.911 13 वा वित्त आयोगातून अंगणवाडी इमारत बांधकाम खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** 13 वा वित्त आयोगातून अंगणवाडी इमारत बांधकामावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक एबाविसेयो अंगणवाडी बांधकाम / 13 वा वित्त आ/2014-2015/का 7,दिनांक 30/03/2015 नुसार कृती आराखडया प्रमाणे 2011-2012 प्रमाणे 2014-2015 प्रमाणे एकुण 4 वर्षात अनुदान रक्कम रुपये 45,00,000/- मंजूर केलेले आहे. शासन निर्णया प्रमाणे एका अंगणवाडी बांधकामासाठी रक्कम रुपये 4,50,000/- इतक्या मर्यादापर्यत खर्च करण्यात यावा असे सूचित केलेले आहे. त्या प्रमाणे 10 अंगणवाडी बांधकामाचे उददीष्ट नियोजित केलेले आहे. परंतू सदर योजनेतून आतापर्यत विभागाने रक्कम रुपये 15,38,567/- खर्च केलेला आहे व उर्वरीत रक्कम 29,61,433/- दिनांक 28/12/2015 रोजी शासन निधीत भरणा केलेली आहे. या सर्व तपशिलाचा विचार करता विभागाने फक्त 3 अंगणवाडया पूर्ण केलेल्या दिसून येतात सदर अंगणवाडी बांधकामा पोटी केलेल्या खर्चातील कोणत्या सालातील किती अंगणवाडयाचे काम सुरू केले व निधी कोणत्या रितीने वितरीत केला याचे लेखे उपलब्ध झालेले नाहीत. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 67 (1 व 2) प्रमाणे खर्चाचे रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये सर्व इमारतीबाबतच्या तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी यांची नोंद करणे, त्याच प्रमाणे रदद करण्यात आलेल्या बांधकामे कोणत्या आदेशाने व कोणाच्या प्राधिकारात घेण्यात आले याबाबत लेखे प्रस्तुत करावेत. व त्याचा तपशिल मा. आयुक्त एकात्मीक बाल विकास मुंबई यांचेकडे पाठवून त्यास मंजुर घेतल्याबाबत पत्र व्यवहार दाखवावा.

2) सदर योजना राज्य शासनाने विशिष्ट गरजाअंतर्गत अंगणवाडी केंद्राचे इमारत बांधकामासाठी मोठया प्रमाणात निधी ग्रामीण व अधिवासी प्रकल्पासाठी वितरीत करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे. व त्यासाठी तरतूद करून सदर तरतूदीतून खालील निर्देशाप्रमाणे खर्च करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नियंत्रण अधिकारी नेमून आणि जिल्हाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना आहरण संवितरण अधिकारी म्हणून घोषित केलेले आहे. त्या प्रमाणे जरूर त्या सर्व जबाबदा-या पार पाडण्याबाबतचे तपासणी अहवाल सादर झालेले नाहीत, निधीचा पूरेपूर वापर व बांधकामे ज्या त्या वर्षामध्ये पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही योग्य रितीने करणे बंधकारक असताना तशी कार्यवाही केलेचे दिसून येत नाही. अशा प्रकारामुळे बांधकामामध्ये नाहक निधी गुंतून राहिला आहे. कामे पूर्ण् न झाल्याने स्थानिक जनतेला शासनाच्या उददीष्टाप्रमाणे जो लाभ मिळणे आवश्यक होते, तसा लाभ मिळू शकला नाही.

3) सदर योजनेतून 4 वर्षाकरीता सन (2011-2012 ते 2014-2015) पर्यत निर्देशित केलेले आहे. सन 2014-2015 अखेर एकुण तरतूदीतून (45,00,000/-) रक्कम रुपये 15,38,567/- खर्च झालेला असून त्या प्रमाणे पूर्ण झालेली बांधकामे फक्त 3 दिसून येतात व त्याची रक्कम रुपये 13,50,000/- इतकी होते परंतु वरील प्रमाणे खर्च रक्कम रुपये 1,88,567/- जादा प्रदान झालेला आहे. सदर रक्कम कोणत्या अंगणवाडी बांधकामासाठी अदा केली ते काम अपूर्ण अवस्थेत राहिले याबाबत योग्य तो कागदोपत्री खुलासा करावा. जादा प्रदान रक्कम कोणत्या आधारे केली याचे स्पष्टीकरण द्यावे. मा.आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना मुंबई या आदेशाचे उल्लंघन करुन रक्कम जादा प्रदान केल्याचे दिसून येते. संबंधितांकडून वसूलात आणावी. व शासन निधीत जमा करावी.

4) एकुण झालेल्या खर्चामधील 2011-2012 ते 2014-2015 पारीत केलेल्या सर्व बिलामधून शासन कपाती करणे अनिवार्य आहे. याबाबत सर्व कपातीची चलने बांधकाम विभागातुन स्वीकृत करूण योग्य रितीने शासन भरणा केल्याचे दाखवावे.

5) महाराष्ट्र जिल्हा व पंचायत समिती लेखासहिंता 1968 चे नियम 97 नुसार सर्व अंगणवाडी बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मालमत्ता रजिस्टर मध्ये सविस्तर नोंद घेतल्याचे दाखवावे.

**3.912 अंगणवाडी अपूर्ण बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 लेखापरीक्षण कालावधी मध्ये पूर्ण झालेली बांधकामे 64, प्रगतीपथावरील बांधकामाची संख्या 16 व अद्याप सुरु न झालेली बांधकामे 34 असा तपशील नमूद असून त्यामध्ये रक्कम रुपये 25,19,211/- इतका निधी अखर्चित आहे. याबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2014-2015 मधील मंजूर कामावर सन 2015-2016 अखेर अनुदान खर्च करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 25,19,211/- इतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसून आले. सदर कामामध्ये रक्कम रुपये 96,00,000/- निधी नाहक गुंतुन पडल्याने सदर कामे विहित मुदतीत पूर्ण न होण्याचे प्रयोजन स्पष्ट करावे. तसेच सदर बांधकामे दर्जात्मक असल्याबाबत खात्री पटविणे आवश्यक आहे.

2) सन 2014-2015 मध्ये 34 कामे मंजूरी होती त्याकरिता रक्कम रुपये 2,04,00,000/- अनुदान प्राप्त होते सदर अनुदान त्याच वर्षात खर्च करणे आवश्यक असताना सदर कामे चालू न झाल्याने सदरचे अनुदान रक्कम रुपये 2,04,00,000/- नाहक 2 वर्षे गुंतुन पडली आहे.

**3.913 अंगणवाडी सेविका / मदतनिस / पर्यवेक्षिका यांना पुरस्कार प्रदानातील अनियमितताबाबत**.

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परीषद नागपूर, महिला व बालकल्याण विभागाव्दारे सन 2014-2015 या वर्षात प्रत्येकी 13 आदर्श अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका व मदतनिस यांना पुरस्कार वाटपापोटी रुपये 99,489/- एवढा खर्च प्रमाणक क्रमांक 2327, दिनांक 31/03/2015 व्दारे केलेला आहे. सदर योजनेस सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आदर्श अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका व मदतनीस यांच्या निवडीचे निकष, स्पर्धेकरीता संबंधितांचे अर्ज नस्तीला उपलब्ध नाहीत. तसेच 6 पर्यवेक्षिका, 6 सेविका व 5 मदतनिस यांचे निवडीचे पत्र नसतांना सुध्दा त्यांना प्रत्येकी रुपये 2,551/- प्रमाणे केलेले शोधन रुपये 43,367/- (17 x 2551/-) वसुलपात्र ठरते.

2) छाया नथ्थुजी कोवर्ते यांचे नावाचा धनादेश वितरीत न करता त्याऐवजी छाया गजानन आत्राम यांना चेक देण्याबाबत गट विकास अधिकारी यांची शिफारस आहे. याबाबत कारणमिमांसा होणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 20 अन्वये प्रदान प्राप्तीची पोहोच उपलब्ध नाही.

**3.914 अंगणवाडी भाडेपट्टीबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** एकात्मिक बाल विकास सेवा योजनाअंतर्गत सन 2014-2015 मध्ये पंचायत समिती व जिल्हा परीषदेकडील असलेल्या अंगणवाडी भाडेकरीता रुपये 1,29,600/- प्रदान करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रकल्प कार्यालय समुद्रपुर व जिल्हा परीषदेकडे एकही अंगणवाडी भाडेतत्वार नसताना सदर प्रकल्पाकडे रुपये 38,000/- प्रदान करण्यात आल्याने सदर निधी गुंतून पडलेला आहे.

2) प्रकल्प कार्यालय वर्धा 2 व सेलु कार्यालयास आवश्यकता नसताना रुपये 1,25,000/- अनुदान वितरीत करण्यात आले. यावरुन जिल्हा स्तरावरुन खर्चाचे अंदाज न घेताच प्रकल्प कार्यालयास अनुदान वितरीत करण्यात आल्याने शासकीय निधी गुंतवुन ठेवण्यात आला आहे.

3) प्रकल्प कार्यालय, देवळी अंतर्गत नाचनगाव व गुंजखेडा येथे अंगणवाडी बांधकामाकरीता 13 वा वित्त आयोग योजनेअंतर्गत अनुदान वितरीत करण्यात आले. सदर अंगणवाडी बांधकाम दिनांक 31/03/2014 पर्यंत पुर्ण

होणे आवश्यक होते. तरी सदर अंगणवाडींना सन 2014 2015 मध्ये भाडेपट्टी अनुदेय ठरत नाही. सदर अंगणवाडीस प्रदान केलेले रुपये 6,800/- वसुलपात्र ठरतात.

4) जिल्हा विकास निधी अंतर्गत प्रकल्प कार्यालय, देवळी अंतर्गत नाचनगाव, अंगणवाडी 132, 133 व गुंजखेडा 120 अंगणवाडीचे बांधकाम पुर्ण झाल्याचे अहवालात नमुद आहे. तरी माहे सप्टेंबर 2014 पासुन सदर अंगणवाडी प्रदान केलेल भाडेपटी रुपये 1,400/- वसुलपात्र ठरतात.

**3.915 अंगणवाडी बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** सन 2014-2015 मध्ये सन 2013-2014 मधील 51 अंगणवाडीचा अंतीम हप्ता, सन 2014-2015 मधील 60 अंगणवाडीचा प्रथम हप्ता व म्हसाळा 71 मॉडेल अंगणवाडी बांधकामाकरीता रुपये 42,35,200/- अनुदान वितरीत करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अंतिम हप्ता प्रदान करण्यात आलेल्या 51 अंगणवाडीचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाही.

2) म्हसाळा 71 अंगणवाडी बांधकामाकरीता रुपये 6,00,000/- एकरक्कमी अनुदान प्रदान करण्यात आले. परंतु शासनाच्या ई-निविदा संबंधी संकेतस्थळाची तपासणी केली असता म्हसाळा 71 करीता दिनांक 13/04/2015 रोजी ई-निविदा बोलविण्यात आली. तरी माहे 8/2014 ते माहे 04/2015 कालावधीतील अनुदान रक्कमेवर बँकेचे व्याज संबंधीत एजन्सी कडुन वसुलपात्र ठरते.

3) महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दि 29/02/2001 नुसार प्री फाब्रीकेटेड स्टक्चर टेक्नॉलॉली चा वापर करुन अंगणवाडी बांधकाम करण्याबाबत ई- निवीदेदवारे प्रस्ताव मागवुन अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करावे असे नमुद आहे. प्रथम हप्त्याचे अनुदान वितरीत केलेल्या 60 अंगणवाडी प्रस्तावापैकी माहे 31 मार्च अखेर 15 अंगणवाडी बांधकामाचे प्रस्ताव ई - निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द केल्याचे दिसुन येते. अंगणवाडी बांधकामाकरीता प्रदान अनुदान 3 ते 4 महिने कालावधीत बँकेच्या खात्यात जमा असल्याचे दिसुन येते. तरी संबंधीत 60 अंगणवाडी बांधकाम एजन्सीकडुन प्रदान अनुदान रक्कमेवरील व्याजाची वसुली करणे आवश्यक आहे.

अंगणवाडी बांधकाम एजन्सीकडुन ई-निविदा प्रक्रीया पुर्ण होण्यापुर्वीच वरील शासन निर्णयाचे उल्लंघन करुन अनुदान प्रदान करण्यात आलेले आहे.

**3.916 लेखापरिक्षणास प्रमाणके उपलब्ध न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात खालील नमुद प्रमाणके, नस्ती, खर्चाबाबत अभिलेखे, शिर्ष, खर्चाचा उद्देश व प्रदानाबाबतचा तपशिलवार अभिलेख लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

1) साईनाथ रेस्टारेन्ट गोंदिया रुपये 14,254/- दिनांक 31/03/2015

2) नमन एन्टरप्राईजेस गोंदिया रुपये 21,342/- दिनांक 31/03/2015

3) ताराम सर्विसेस औरंगाबाद रुपये 7,200/- दिनांक 31/03/2015

4) अभी सिस्टम गोंदिया रुपये 20,830/- दिनांक 31/03/2015

5) श्री डी.डी.ढोरे रुपये 9,157/- दिनांक 31/03/2015

एकुण रुपये 72,783/-

**3.917 जडसंग्रह नोंदवहीबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8)** - सन 2014-2015 चे लेखापरिक्षणात जडसंग्रह नोंदवहीची तपासणी केली असता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम

98(2) प्रत्येक वित्तीय वर्षात एकदा जडसंग्रह वस्तुची पडताळणी करुन मालसंग्रहाची आवक अस्तित्व व संख्या व दर्जा यांचे अचुकतेबाबत विहित प्रमाणपत्र नोंदवहीत नोंदविलेले नाहीत. लेखासंहिता नियम 98(1) प्रमाणे प्रतिवर्षी विभाग प्रमुखानी वार्षिक तपासणी केलेली नाही.

**3.918 पोषण आहाराबाबत.**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2014-2015 मध्ये अंगणवाडयांना पुरक पोषण आहाराबाबत रुपये 10,92,96,069/- खर्च केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पोषण आहार मागील शिल्लक किती व मागणी किती व वापर किती याबाबतचा अहवाल व प्रकल्पाची मागणी व शिल्लक याबाबतचा अहवाल सबंधित नस्तीमध्ये उपलब्ध नसुन लेखा परिक्षणास प्राप्त झाले नाही.

2) अंगणवाडयांना पुरविलेल्या पुरक पोषण आहाराच्या नमुन्याची स्थानिक प्रयोग शाळेकडुन वर्षातुन 2 वेळा अचानक तपासणी केलेली नसल्याने वर्षभर पुरविण्यात आलेल्य पुरक पोषण आहारात 1 एककासाठी 30 उष्मांक व 8 ते 10 प्रथीने व 2 एककासाठी 600 उष्मांक व 16 ते 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार असल्याची तपासणी करता आली नाही.

3) वापरलेला तांदुळ व स्वस्त धान्य दुकानातुन उचललेला तांदुळ यांची ताळमेळ नोंदवहया लेखापरिक्षणास प्राप्त झाल्या नाही.

4) खर्च झालेल्या रक्कमांची तपासणी करण्याकरिता अंगणवाडी सेविकेचे मुळ अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नसल्यामुळे त्याबाबतची तपासणी करता आली नाही.

5) अनुदान वितरण आदेशातील (सर्व) अटी व शर्ती मधील अट क्रमांक 3 प्रमाणे बालविकास प्रकल्प अधिकारी (सर्व) यांनी देयके कोषागारातुन आहरण केल्याचे उपयोगीता प्रमाणपत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी(मबाक), जि.प.चंद्रपूर यांना सादर करावयाचे असतांना सदर उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीमध्ये उपलब्ध नसुन लेखापरीक्षणास प्राप्त झाले नाही.

6) नस्तीची तपासणी केली असता त्यामध्ये अनुदान वितरण आदेश (उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जिल्हा परिषद, चंद्रपूर दिनांक 31/07/2014, 19/09/2014 व 29/09/2014 या आदेशांना क्रमांक देण्यात आले नाही तसेच रुपये 58,60,000/- (पोषण आहार) चे अनुदान वितरण आदेशाला क्रमांक व दिनांक देण्यात आलेला नाही.

7) वाढीव मानधनाचे अनुदान वितरण प्रमाणे खर्च नोंदविण्यात आलेला आहे. परंतु त्यामध्ये विद्यार्थी संख्या नोंदविण्यात आलेली नसल्यामुळे प्रत्यक्ष् खर्चाची परिगणना करण्यात आलेली नाही.

**3.919 आस्थापनेवर कार्यरत नसलेल्या कर्मचाऱ्याला नियमबाहय प्रवास भत्ता अदा करणेबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** आस्थापनेवर कार्यरत नसलेल्या कर्मचाऱ्याला नियमबाहय प्रवास भत्ता रक्कम रूपये 14,398/- अदा करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री.पी.डब्ल्यु,चहारे, वरिष्ठ सहायक (लेखा) हे महिला व बाल कल्याण विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत असतांना त्यांचे प्रवास भत्ता देयक एकात्मिक बाल विकास विभागाच्या लेखाशिर्षातुन काढण्यात आले आहे. तरी याबाबतचे मंजुरी आदेश असल्यास आदेश प्रत सादर करण्यात यावे.

2) सदर कर्मचारी कार्यरत असलेल्या आस्थापनेचे प्राप्त अनुदानातुनच प्रवास भत्याचे रक्कमा अदा करणे आवश्यक आहे. परंतु सदर कर्मचारी यांचे प्रवास भत्ता देयक एकात्मिक बाल विकास या लेखाशिर्षाअंतर्गत प्राप्त तरतुदीतुन प्रदान केले असल्यामुळे अनियमितता झालेली आहे. तरी महिला बाल कल्याण विभाग यांचे प्राप्त तरतुदीतुन सदर रक्कम रूपये 14,398/- एकात्मिक बाल विकास विभाग यांचे लेखाशिर्षात वर्ग करण्यात यावे.

3) सदर अनियमिततेबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

**3.920 एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अभिकरण शुल्क वसुल न केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक मविआ 1099/ प्र.क्र.3458 /24, दिनांक 20/05/1999 व जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 123 नुसार अभिकरण तत्वावर जिल्हा परिषदे मार्फत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजना/कामे यासाठी जिल्हा परिषदेस दिनांक 01/04/1999 पासुन 5 टक्के अभिकरण शुल्क देय आहे. त्यापैकी 4 टक्के अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेने संबंधीत वर्षाच्या तरतुदीमधुन मुळात (At-Source) कापून घ्यावे व उर्वरीत 1 टक्का रक्कम खर्चाचे लेखापरीक्षण झाल्यावर नियंत्रण अधिकाऱ्यामार्फत जिल्हा परिषदेने प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

2) एकात्मिक बाल विकास सेवा योजने संदर्भात अभिकरण शुल्क हे जिल्हा परिषदेने प्राप्त करुन घेतले नसल्याने सन 2010-2011 पासुन आक्षेपात नमूद तपशिलानुसार एकूण रक्कम रुपये 3,99,22,960/- प्राप्त होणे बाकी आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे स्वत:चे उत्पन्न कमी होत आहे व जिल्हा परिषद उपकरातून राबवण्यात येणाऱ्या योजनांसाठीच्या निधीवर विपरीत परिणाम होत आहे.

**3.921 सभापती (बाल कल्याण) यांचे शासकीय निवासस्थान करिता साहित्य खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** एकात्मिक बाल विकास विभागाअंतर्गत जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सभापती (बाल कल्याण) यांचे शासकीय निवासस्थान करिता साहित्य खरेदीवर रूपये 39,500/- खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2001/प्र.क्र.132/पं.स.7(26),दिनांक 05/09/2002 नुसार दरकरार अस्तित्वात नसल्याबाबत लेखी स्वरुपात खात्री करुन घेणे आवश्यक असताना विभागाकडुन अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 80 नुसार खर्चाच्या नोंदी नमुना नंबर 30 आकस्मिक खर्चाच्या नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक असतांना अशी नोंदवही ठेवली नाही.